नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १०/०८/२०२४ (शनिवार) दुपार

---

### पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत सराफा दुकानदारांची बैठक संपन्न

पोलीस स्टेशन सावनेर येथे दिनांक ०९/०८/२०२४ रोजी २०.३० वा. ते २१.३० वाजता पर्यंत मा. श्री. अनिल म्हस्के सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. रवींद्र मानकर पोलीस निरीक्षक सावनेर यांचे उपस्थितीमध्ये सराफा दुकानदारांची बैठक घेण्यात आली बैठकीमध्ये दुकानदारांना सुरक्षा संबंधात काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. खाजगी सुरक्षा गार्डची नेमणूक करावी, सीसीटीव्ही कॅमेरे लावावे कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

सदर बैठक मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात मा. श्री. अनिल म्हस्के सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर विभाग सावनेर, श्री. रवींद्र मानकर पोलीस निरीक्षक सावनेर तसेच सावनेर येथील सराफा दुकानदार उपस्थित होते.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर